पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पिंपरी - ४११ ०१८.

**मा.महिला व बालकल्याण समिती**

कार्यपत्रिका क्रमांक - **१६**

**सभावृत्तांत**

दिनांक - **०८/०६/२०२०** वेळ - सकाळी ११.०० वा.

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या मा.महिला व बालकल्याण समितीची पाक्षिक सभा सोमवार दिनांक ०८/०६/२०२० रोजी सकाळी ११.०० वाजता महापालिकेच्या प्रशासकीय इमारतीमधील महापौर मधुकरराव रामचंद्र पवळे सभागृहात आयोजित करणेत आली होती. सभेस खालील सन्मा.सदस्य उपस्थित होते.

**१. मा.कुटे निर्मला संजय - सभापती**
२. मा.गोफणे अनुराधा देविदास
३. मा.मुंढे उषा अंकुश
४. मा.सुजाता सुनिल पालांडे
५. मा.साधना अंकुश मळेकर
६. मा.पवळे सुमनताई मुधकर
७. मा.कदम निकीता अर्जुन
८. मा.अश्विनी गजानन चिंचवडे- पाटील

या शिवाय मा.उल्हास जगताप – नगरसचिव तथा सहा.आयुक्त ( नाविया ), हे अधिकारी सभेस उपस्थित होते.

----------

**उपस्थित सन्मा.सदस्यांचे संमतीने खालील ऐनवेळचे विषय सभा कामकाजामध्ये दाखल करुन घेणेत आले.**

विषय क्र.२) विद्यार्थीनींना सॅनिटरी नॅफकीन उपलब्ध करुन देणेबाबत.- मा.भिमाबाई फुगे, मा.उषा मुंढे यांचा प्रस्ताव.

विषय क्र.३) महिलांची कोरोना पूर्व आणि कोरोना तपासणी करणेबाबत. – मा.सुजाता पालांडे , मा.साधना मळेकर यांचा प्रस्ताव.

विषय क्र.४) प्राथमिक शिक्षण विभागामार्फत महिला व बालकल्याण समितीपूढे सर्व विषय सादर करणेबाबत. – मा.सुजाता पालांडे , मा.निकीता कदम यांचा प्रस्ताव.

विषय क्र.५) बालवाडीच्या मुलांकरीता सकस आहार पुरवठा करणेकामी मुदतवाढ देणेबाबत. – मा.भिमाबाई फुगे, मा.उषा मुंढे यांचा प्रस्ताव.

----------

खालील प्रमाणे सुचना मांडणेत आली.

सुचक – मा.उषा मुंढे अनुमोदक – मा.अनुराधा गोफणे

मा.महिला व बाल कल्याण समिती दिनांक – ०८/०६/२०२० रोजीची पाक्षीक सभा (कार्यपत्रिका क्रमांक १६) गुरुवार दिनांक - ११/०६/२०२० रोजी दु.२.०० वा. पर्यंत तहकूब करणेत यावी.

सदर सुचना सर्वानुमते मान्य झाली.

----------

**सभापती –** गुरुवार दि.११/०६/२०२० रोजी दुपारी २.०० वाजेपर्यंत सभा तहकूब करणेत येत आहे.

**( कुटे निर्मला संजय )**
**सभापती**
महिला व बालकल्याण समिती
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी – ४११ ०१८

पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पिंपरी - ४११ ०१८.

**मा.महिला व बालकल्याण समिती**

कार्यपत्रिका क्रमांक – १६

**सभावृत्तांत**

( दिनांक ०८/०६/२०२० ची तहकूब सभा )

दिनांक - ११/०६/२०२० वेळ - दुपारी २.०० वा.

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या मा.महिला व बालकल्याण समितीची दिनांक ०८/०६/२०२० ची तहकूब सभा गुरुवार दिनांक ११/०६/२०२० रोजी दुपारी २.०० वाजता महापालिकेच्या प्रशासकीय इमारतीमधील महापौर मधुकरराव रामचंद्र पवळे सभागृहात आयोजित करणेत आली होती. सभेस खालील सन्मा.सदस्य उपस्थित होते.

**१. मा.कुटे निर्मला संजय - सभापती**
२. मा.फुगे भिमाबाई पोपट
३. मा.गोफणे अनुराधा देविदास
४. मा.मुंढे उषा अंकुश
५. मा.सुजाता सुनिल पालांडे
६. मा.साधना अंकुश मळेकर
७. मा.कदम निकीता अर्जुन
८. मा.अश्विनी गजानन चिंचवडे- पाटील

या शिवाय मा.उल्हास जगताप – सहा.आयुक्त(नावियो), मा.जागडे- उपनगरसचिव, मा.बहाद्दरपुरे- सहा.समाज विकास अधिकारी हे अधिकारी सभेस उपस्थित होते.

----------

दिनांक **१४/०६/२०२०** रोजी झालेल्या सभेचा **( कार्यपत्रिका क्रमांक १५ )** सभावृत्तांत कायम करणेत आल्याचे मा.सभापती यांनी प्रकट केले.

----------

ठराव क्रमांक – २७ विषय क्रमांक - ०१
दिनांक – ११/०६/२०२० विभाग- नागरवस्ती विकास योजना
सुचक :- मा.भिमाबाई फुगे अनुमोदक : मा.उषा मुंढे
संदर्भ – मा.महापालिका आयुक्त यांचे पत्र क्र.नावियो/७/कावि/५/२०२० दिनांक – २२/०१/२०२०

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या महिला व बालकल्याण योजने अंतर्गत "पंडित दिनदयाल उपाध्याय – महिलांसाठी ज्ञान कौशल्य वाढ कार्यक्रम" ही योजना मंजूर आहे. मा.महिला व बालकल्याण समितीला संबंधित आर्थिक वर्षामध्ये महिलांकरिता विविध व्यवसाय प्रशिक्षणे, प्रशिक्षणाचे स्वरुप कालावधी निश्चित करणेचे अधिकार मा.महापालिका सभेने ठराव क्रमांक ९९८ दिनांक २०/०९/२०१० अन्वये मा.महिला व बालकल्याण समितीस प्रदान केलेले आहे. मे.सिम्बायोसिस

स्कील्स अँन्ड ओपन युनिव्हर्सिटी यांनी सोबतच्या प्रपत्र "अ" नुसार रोजगारक्षम व्यवसाय प्रशिक्षण कार्यक्रमांची यादी सादर केली आहे. रोजगार निर्मितीकरीता सदर अभ्यासक्रम उपयुक्त असून मे.सिम्बायोसिस स्कील्स अँन्ड ओपन युनिव्हर्सिटीकडील हे विद्यापीठ महाराष्ट्र शासन, मिनीस्ट्री ऑफ एच.आर.डी. भारत शासन व युनिव्हर्सिटी ग्रँट कमिशनद्वारे प्रमाणित आहे. यापैकी अनेक कोर्सेस नॅशनल स्कील डेव्हलपमेंन्ट कॉर्पोरेशन द्वारे मान्यता प्राप्त आहेत त्यामुळे मे.सिम्बायोसिस स्कील्स अँन्ड ओपन युनिव्हर्सिटीकडील यांना महाराष्ट्र महापालिका अधिनियमाचे अनुसूची प्रकरण ५(२)(२) नुसार सदर कामकाज थेट पध्दतीने देता येणे शक्य आहे.

शासन निर्णय दिनांक १२ जानेवारी २०१७ नुसार प्रशिक्षण खर्चाच्या प्रतिपुर्तीचे टप्पे –

| | | |
|---|---|---|
| १) | प्रशिक्षण सुरु झाल्यावर ७ दिवसांचे आत (प्रशिक्षणार्थ्यांच्या पहिल्या आठवड्यातील महत्तम बायोमेट्रीक प्रणालीवरील उपस्थितीच्या आधारे). | ३०% |
| २) | प्रशिक्षण संपल्यानंतर (मुल्पमापन व प्रमाणीकरणाअंती) - | ३०% |
| ३) | यशस्वी उमेदवारांपैकी किमान ७५% उमेदवारांना रोजगार / स्वयंरोजगार मिळून तीन महिन्यानंतर विहित कागदपत्रे / पुरावे सादर करणे आवश्यक) | २०% |
| ४) | उमेदवारांना ६ महिन्यापर्यंत रोजगार / स्वयंरोजगार उपलब्ध झाल्याबाबत विहित कागदपत्रे / पुरावे सादर केल्यावर आणि त्याचे मुल्पमापन फॉर्म MSSDS यांना पोर्टलद्वारे प्राप्त झाल्यानंतर | २०% |

मे.सिम्बायोसिस स्कील्स अँन्ड ओपन युनिव्हर्सिटी यांनी दि.१६/०१/२०२० रोजी NSDC मान्यता प्राप्त कोर्सेस आणि युनिव्हर्सिटीकडील मान्यता प्राप्त कोर्सेसकरिता साधारणपणे आवश्यक लाभार्थी उद्दिष्ट या कार्यालयास कळविले असून त्यानुसार प्रपत्र "अ" प्रमाणे नॅशनल स्कील डेव्हलपमेंट कॉर्पोरेशन (NSDC) चे मान्यता प्राप्त २१ प्रशिक्षणांकरिता साधारणपणे र.रु.१,८८,७५,०००/- खर्च अपेक्षित असून मे.सिम्बायोसिस स्कील्स अँन्ड ओपन युनिव्हर्सिटीकडील मान्यता प्राप्त १४ प्रशिक्षणांकरिता साधारणपणे र.रु.३,१२,४५,०००/- याप्रमाणे एकुण ५,०१,२०,०००/- (अक्षरी र.रु.पाच कोटी एक लाख वीस हजार फक्त) खर्च अपेक्षित आहे. सदर प्रशिक्षणांबाबतचे वेळोवेळी शासन निर्णय दि.१२ जानेवारी २०१७ नुसार विविध टप्प्यानुसार प्रशिक्षणाचे पुर्ततेबाबतचा अहवाल घेऊन व शेवटचा हप्ता रोजगार निर्मितीबाबत खात्री करुन अदा करावयाचा आहे. तरी मे.सिम्बायोसिस स्कील्स अँन्ड ओपन युनिव्हर्सिटी यांचेमार्फत त्यांनी सादर केलेल्या प्रस्तावानुसार नॅशनल स्कील डेव्हलपमेंट कॉर्पोरेशन (NSDC) मान्यता प्राप्त प्रपत्र "अ" नुसार २१ प्रशिक्षणांचे आयोजन करण्यास तसेच प्रपत्र "ब" नुसार मे.सिम्बायोसिस स्कील्स अँन्ड ओपन युनिव्हर्सिटी मान्यता प्राप्त १४ प्रशिक्षणांचे आयोजन करण्यास व त्याकरिता येणा-या एकुण र.रु.५,०१,२०,०००/- (अक्षरी र.रु.पाच कोटी एक लाख वीस हजार फक्त) चे खर्चास मान्यता घेणेकामी मा.स्थायी समिती सभेकडे शिफारस करणेबाबत मा.आयुक्त यांची मागणी असली तरी 'स्थायी समितीसभेकडे शिफारस करणेत येत आहे'. हा मजकूर वगळणेत येऊन सदर विषय दप्तरी दाखल करणेस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

**सभा कामकाजामध्ये दाखल करुन घेणेत आलेले विषय घेणेत आले.**

ठराव क्रमांक – २८ विषय क्रमांक - ०२

दिनांक – ११/०६/२०२०

सुचक : मा.भिमाबाई फुगे अनुमोदक : मा.उषा मुंढे

संदर्भ : मा.भिमाबाई फुगे ,मा.उषा मुंढे यांचा प्रस्ताव –

मा.भिमाबाई फुगे ,मा.उषा मुंढे यांनी प्रस्तावित केलेनुसार पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या शाळांमधील इयत्ता ८ वी, ९वी, व १०वी मध्ये शिक्षण घेणा-या विद्यार्थीनींना महिला व बालकल्याण योजनेतुन मोफत सॅनिटरी नॅफकीन उपलब्ध करुन देण्यास मान्यता देण्यात येत आहे. तसेच या करीता विहित पध्दतीने संस्थेची नेमणूक करुन मंजुर दराने येणा-या प्रत्यक्ष खर्चास मान्यता देणेकामी मा.स्थायी समिती सभेकडे शिफारस करणेत येत आहे. सभावृत्तांत कायम होणची वाट न पाहता ठराव मा.स्थायी समिती सभेकडे पाठविणेत यावा.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक – २९ विषय क्रमांक - ०३

दिनांक – ११/०६/२०२०

सुचक : मा.सुजाता पालांडे अनुमोदक : मा.साधना मळेकर

संदर्भ : मा.सुजाता पालांडे ,मा.साधना मळेकर यांचा प्रस्ताव –

मा.सुजाता पालांडे ,मा.साधना मळेकर यांनी प्रस्तावित केलेनुसार पिंपरी चिंचवड महानगरपालिकेमार्फत कोरोनाचा प्रार्दुभाव रोखण्यासाठी विविध उपाययोजना करण्यात येत आहेत. शासनाने लॉकडाऊनच्या बहुतांशी अटी शिथिल केल्याने भविष्यकाळामध्ये शहरामध्ये कोरोना रुग्णांची संख्या वाढण्याची शक्यता आहे. शहरातील महिला,वयोवृध्द महिला तसेच मधुमेह,उच्च रक्तदाब यासारखे आजार असलेल्या महिलांना कोरोनाचा धोका जास्त आहे. कुटुंबाची सर्व जबाबदारी महिलांवर असते त्यामुळे महिलांच्या आरोग्याची काळजी घेणे आवश्यक आहे. तरी महापालिकेमार्फत योग्य त्या संस्थेची विहित पध्दतीने नेमणूक करुन महापालिका क्षेत्रात वास्तव्य असलेल्या महिलांची कोरोना पूर्व आणि कोरोना तपासणी करण्यात यावी. आणि याबाबतचा खर्च महिला बालकल्याण योजनेअंतर्गत "इतर योजना/कार्यक्रम" या लेखाशिर्षावर करण्यात आलेल्या तरतुदीतून करणेस मान्यता देणेकामी तसेच याकामी संस्था निश्चित करुन तपासणी करीता येणा-या खर्चास मान्यता देणेकामी मा.स्थायी समिती सभेकडे शिफारस करण्यात येत आहे. सभावृत्तांत कायम होणेची वाट न पाहता ठराव मा.स्थायी समिती सभेकडे पाठविणेत यावा.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक – ३० विषय क्रमांक - ०४

दिनांक – ११/०६/२०२०

सुचक : मा.सुजाता पालांडे अनुमोदक : मा.निकीता कदम

संदर्भ : मा.सुजाता पालांडे ,मा.निकीता कदम यांचा प्रस्ताव –

मा.सुजाता पालांडे ,मा. निकीता कदम यांनी प्रस्तावित केलेनुसार पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या महिला व बालकल्याण योजनेअंतर्गत शहरातील महिला व बालके यांच्या हिताच्या दृष्टीने विविध योजना राबविणेत येत आहेत. सदरची बाब महिला व बालकल्याण समितीच्या कार्यकक्षेत समाविष्ट आहे. तथापि शिक्षण समितीमार्फतही ब-याच वेळा याबाबत निर्णय होत असल्याने समितीच्या अधिकारांवर त्याचा परिणाम होतो. तरी महापालिकेच्या प्राथमिक शिक्षण विभागामार्फत चालविण्यात येणा-

या बालवाडया संबंधित बालकांच्या सर्वांगीन विकासाच्या दृष्टीने राबविण्यात येणा-या योजना / विविध उपक्रम याबाबत निर्णय घेण्याचे कार्यक्षेत्र महिला व बालकल्याण समितीच्या अधिकार कक्षेत असल्याने यापुढे याबाबतचे सर्व विषय प्राथमिक शिक्षण विभागामार्फत महिला व बालकल्याण समितीपूढे सादर करणेकामी मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक – ३१ विषय क्रमांक - ०५

दिनांक – ११/०६/२०२०

सुचक : मा.भिमाबाई फुगे अनुमोदक : मा.उषा मुंढे

संदर्भ : मा.भिमाबाई फुगे ,मा.उषा मुंढे यांचा प्रस्ताव –

मा.भिमाबाई फुगे ,मा.उषा मुंढे यांनी प्रस्तावित केलेनुसार पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या शिक्षण विभागातील मनपा बालवाडयांमधील विद्यार्थ्यांना सकस आहार पुरविणे येत होता. सदर सकस आहार पुणे महानगरपालिकेच्या धर्तीवर व त्याच दारामध्ये पिंपरी चिंचवड महानगरपालिका बालवाडयांमधील विद्यार्थ्यांना सकस आहार पुरवठा करणेत येत होता. पिंपरी चिंचवड महानगरपालिका शिक्षण विभाग यांचे वतीने पिंपरी विभाग व चिंचवड विभागातील प्राथमिक शाळेतील बालवाडयांमधील विद्यार्थ्यांना सन २०१९-२० करीता सकस पोषण आहार पुरविणेकामी माहे मार्च २०२० अखेर मुदत देणेत आलेली होती. तथापि सद्यस्थितीमध्ये पिंपरी चिंचवड क्षेत्रामध्ये कोरोना विषाणूचा प्रादुर्भाव होत असलेने प्राथमिक शाळा सुरु झालेनंतर माहे एप्रिल २०२० ते माहे मार्च २०२१ अखेर शालेय विद्यार्थ्यांना सकस आहार पुरविणेकामी मे.सहयाद्री आदिवासी महिला विकास प्रतिष्ठाण,पिंपळेगुरव यांना मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

यानंतर मा.सभापती यांनी सभा संपल्याचे जाहिर केले.

**( कुटे निर्मला संजय )**
**सभापती**
महिला व बालकल्याण समिती
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी – ४११ ०१८.

पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी १८. नगरसचिव कार्यालय
क्रमांक : नस/४/कावि/१८९/२०२०
दिनांक : १२/०६/२०२०



**( उल्हास बबनराव जगताप )**
**नगरसचिव**
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी ४११ ०१८.

प्रत : सर्व संबंधित शाखाप्रमुख व शाखाधिकारी यांचेकडे पुढील योग्य त्या कार्यवाहीसाठी रवाना.

( विषय क्रमांक १ शी संलग्न )

प्रपत्र "अ"

## Proposed Courses

| Sector/ Category | Job Role | Entry Level | Duration | Job Opportunities | NSDC / SSOU | FEES per Student |
|---|---|---|---|---|---|---|
| Logistics | Consignment Booking Assistant | Class XII / Diploma/gradute | 270 hours | Dryports, Warehouses, Cold Chains especially the new development in the state under various projects like Samruddhi | NSDC QP | 10200 |
| | Courier Delivery Executive | Class XII / Diploma/gradute | 270 hours | E-commerce and courier companies | NSDC QP | 10200 |
| | Warehouse Executive | Class XII / Diploma pass with relevant experience | 550 hours | Warehousing operations, Documentation and Reporting | NSDC QP | 28000 |
| | Export Documentation Executive | Graduate | 780 hours | In any enterprise that has export documentation work | NSDC QP | 28000 |
| | Inventory Clerk | Class XII / Dploma/gradute | 250 hours | Inventory Clerk. This job role is applicable in both national and international scenarios | NSDC QP | 10200 |
| Telecom | Optical Fiber Technician | 12th Science Pass | 4.5 months | Telecom tower setting and cable laying companies | NSDC Two QPs | 40000 |
| Domestic Work | Elderly Care Taker | 5th pass house wives | 2.5 months | Growing need for elderly care takers | NSDC QP | 10200 |
| | Child Care Taker | **10th pass house wives** | 2.5 months | Growing need for elderly care takers | NSDC QP | 10200 |
| Automobile & Engineering | Auto Service Technician | Class VIII | 3 months (both 2 and 4 wheeler servicing) | Making unemployed youth start their own servicing ventures or joint dealerships | NSDC QP | 27000 |
| | Telecaller | 12th pass youth | 1.5 months | Telecaller | NSDC QP | 10200 |
| | Showroom Host/Hostess | 12th pass youth | 2 months | Showroom Host/Hostess | NSDC QP | 10200 |
| | Sales Consultant (pre-owned vehicles) | ITI/Diploma | 1.5 months | Sales Consultant | NSDC QP | 10200 |
| | Sales Consultant (Automotive finance) | ITI/Diploma | 2 months | Sales Consultant | NSDC QP | 10200 |
| | Field Technician Air Conditioner | 8th Pass with 2 yrs experience as helper | 1.5 months | Technician | NSDC QP | 10200 |
| | CNC Programming | Diploma / BE | 100 Hrs | | NSDC QP | 10200 |
| Banking | Banking Correspondent and Facilitator | 12th standard, willing to travel / relocate | | Growing rural banking requirements | NSDC QP | 10200 |
| Beauty & Wellness | Assistant Beauty Therapist | 8th pass with ability to read & write | 3 months | Work as Beautician in Beauty Parlours or start home services | NSDC QP | 15000 |
| | Yoga Instructor / Trainer | 10th pass | 3 months | Work as a Yoga Teacher | NSDC QP | 15000 |
| IT & ITES | Technical Support Executive-Voice | 12th pass | 400 hrs | | NSDC QP | 20000 |
| | Technical Support Executive-Non Voice | 12th pass | 400 hrs | | NSDC QP | 20000 |
| | Junior Data Associate | BSc (Stat, Math, Physics, Chemistry, Geology) or BE/BTech Max Education – MTech (Engg, CSE), MS (Stat, Math, Physics, Chemistry, Geology). | 400 hrs | Data Scientists | NSDC QP | 45000 |

आयुक्त
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी १८.

प्रपत्र "ब"

## Proposed Courses

| Sector/ Category | Job Role | Entry Level | Duration | Job Opportunities | | SOES Fees |
|---|---|---|---|---|---|---|
| IT & ITES | Robotics programming | ITI/Diploma | 120 hours | Robotics programmer | SSOU Course | 25000 |
| | Blockchain | Programmer | 35 hours | Blockchian programmer | SSOU Course | 25000 |
| | ML Engineer | Graduate, Programmimg Knowledge | 450 hrs | Machine Learning AI expert | SSOU Course | 65,000 |
| Soft Skills | Interview Skills | Graduate | 20 hrs | In service training/ skill upgradation | SSOU Course | 5000 |
| | Personality development | Graduate | 20 hrs | In service training/ skill upgradation | SSOU Course | 10000 |
| Teacher Training | Capacity Building | School/College teachers | 40 hrs | In service training/ skill upgradation | SSOU Course | 5000 |
| | Information Systems in education | Graduate/teachers | 25 hrs | In service training/ skill upgradation | SSOU Course | 5000 |
| | Research paper Writing | Graduate/teachers | 25 hrs | In service training/ skill upgradation | SSOU Course | 5000 |
| | ICT in teaching and Content making | Graduate/teachers | 25 hrs | In service training/ skill upgradation | SSOU Course | 5000 |
| | Presentation Skills | Graduate/Post/Graduates | 25 hrs | In service training/ skill upgradation | SSOU Course | 5000 |
| | Skill Course Pedagogy | Graduate/teachers | 20 hrs | In service training/ skill upgradation | SSOU Course | 5000 |
| Mechatronics | PLC Programming | ITI/Diploma | 30 hours | PLC programmer | SSOU Course | 20000 |
| | Laser Cutting Machine Operator | ITI/Diploma | 30 hours | PLC programmer | SSOU Course | 20000 |
| | Automation and Controls | ITI / Diploma | 120 Hrs | | SSOU Course | 25000 |

आयुक्त
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी १८.